महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः कअप १२१७/प्र.क्र.११९/१४ब
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०३ एप्रिल, २०१८

आदेश :-

मंत्रालयीन विभागातील खालील सहायक कक्ष अधिकारी (गट (ब) अराजपत्रित- वेतनश्रेणी रु.९३००-३४८००- ग्रेड पे रु. ४३००) यांना सन २०१७-२०१८ या निवडसूची वर्षासाठी कक्ष अधिकारी (गट(ब) राजपत्रित- वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० -ग्रेड पे रु. ४८००) पदावर या आदेशाद्वारे विहित अटीच्या अधीनतेने तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच सदर सहायक कक्ष अधिकारी यांची त्यांच्या नावासमोर स्तंभ-६ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विभागामध्ये पदस्थापना करण्यात येत आहे.

अ. क्र.	श्री/ श्रीमती	नाव	प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदोन्नतीनंतरचा विभाग
१	२	३	४	५	६
१	श्री	गं.म. गायकवाड	अजा (खुल्या प्रवर्गात नियुक्ती)	नगर विकास विभाग	सार्वजनिक बांधकाम विभाग

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या विरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधि व न्याय विभागाने दिनांक २८.१२.२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तूर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दिनांक २५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी, अशा सूचना सा.प्र.वि./कार्यासन १६ब ने दिनांक २९.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिल्या आहेत.

त्यानुसार सदर सहायक कक्ष अधिकारी यांची कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे. त्याशिवाय सदर तदर्थ पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) वरील सहायक कक्ष अधिकारी यांना कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती त्यांचेविरूध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित नाही.

(ब) वरील सहायक कक्ष अधिकारी यांची तदर्थ पदोन्नती मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक २९८२/२०००, २९८६/२०००, ४९५८/२००३, ३३७४/२०११ च्या अधीन राहतील. तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई येथे दाखल केलेला मूळ अर्ज क्रमांक ८६२/२०१६ च्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहील.

(क) सदर तदर्थ पदोन्नती अकरा महिने किंवा सामान्य प्रशासन विभागाकडून निवडसूचीवरील नियमित कक्ष अधिकारी नियुक्त होईपर्यंत यापैकी जे लवकर घडेल तेवढ्या कालावधीकरिता असेल.

(ड) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ कक्ष अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी कक्ष अधिकारी संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठतम अधिकाऱ्याला पदावनत करण्याच्या अधीन राहून सदर तदर्थ पदोन्नत्या देण्यात येत आहेत.

(इ) वरील सहायक कक्ष अधिकारी यांची कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

(ई) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित सहायक कक्ष अधिकारी यांना नियमित पदोन्नतीचे, ज्येष्ठतेचे किंवा आणखी कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(फ) सदर पदोन्नती तदर्थ असून या पदोन्नती केवळ पदोन्नत कोट्यात उपलब्ध होणाऱ्या पदांनुसार नियमित करण्यात येतील.

३. संबंधित सहायक कक्ष अधिकारी यांनी कक्ष अधिकारी पदाची तदर्थ पदोन्नती न स्वीकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दिनांक १२.०९.२०१६ अन्वये त्यांचे नाव सन २०१७-२०१८ च्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठीची पात्रता तपासण्यात येईल.

४. हे आदेश तत्काळ अंमलात येतील. पदोन्नत झालेल्या सहायक कक्ष अधिकारी यांना संबंधित विभागाने तत्काळ कार्यमुक्त करुन या विभागास कळवावे. तसेच पदोन्नत सहायक कक्ष अधिकारी यांनी पदस्थापना केलेल्या विभागात तत्काळ रुजू व्हावे.

५. महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरणातील तरतुदीनुसार पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण घेणे संबंधितांवर बंधनकारक राहील, अन्यथा संबंधित कक्ष अधिकाऱ्यास सहायक कक्ष अधिकारी पदावर पदावनत करण्यात येईल.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०३१६२६३८८९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan
Bhimrao
Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.04.03 16:28:01 +05'30'

(ग. भि. गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री. गं.म. गायकवाड, सहायक कक्ष अधिकारी (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)

प्रत,

१ अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)

२ सह सचिव/उप सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग.

त्यांना विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरणातील "नवीन विषयाची तोंडओळख प्रशिक्षण" या प्रशिक्षणांतर्गत पदोन्नत कक्ष अधिकाऱ्यांना आपल्या विभागामार्फत १ ते ३ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात यावे.

३ कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, का.क्र./१४,१४-अ

४ निवडनस्ती, का.क्र.१४-ब /संग्रहार्थ.